न्यायालयीन प्रकरण हाताळण्याबाबत घ्यावयाची दक्षता

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः विधी-२०१९/प्र.क्र.२२/विधी कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २८ जून, २०१९

<u>प्रस्तावना</u> :--

ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषदेच्या अनेक न्यायालयीन प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्याकडून प्रकरणे हाताळण्यात होत असलेली दिरंगाई व विलंबामुळे तसेच शपथपत्र विहीत मुदतीत न दाखल केल्यामुळे आणि जिल्हा परिषद चे संबंधित विषयाचे अधिकारी मा. उच्च न्यायालयाच्या सुनावणीस हजर रहात नसल्यामुळे रिट याचिका क्र. ५३९७/२०१८ अनंत रघुनाथराव गर्जे विरुध्द महाराष्ट्र शासन या रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयानी शासनाविरुध्द तसेच जिल्हा परिषद, अकोला विरुध्द अत्यंत नाराजी व्यक्त केलेली आहे. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना न्यायालयीन प्रकरणामध्ये विहीत मुदतीत शपथपत्र दाखल करणे तसेच सदर प्रकरणे गांभीर्याने हाताळण्याबाबतच्या सर्व जिल्हा परिषदांना देण्याच्या सूचना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

<u>शासन परिपत्रक</u> :--

१) ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य प्रशासन) यांना न्यायालयीन याचिकांच्या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत तसेच सर्व न्यायालयीन प्रकरणांच्या बाबत नोडल अधिकारी म्हणून सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घोषित करण्यातचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

२) जिल्हा परिषदेच्या नोंदणी शाखेमध्ये येणारे न्यायालयीन प्रकरण, सर्वप्रथम उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विधि अधिकाऱ्याच्या मदतीने प्राथम्याने हाताळावे.

३) जिल्हा परिषदेच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य

प्रशासन) यांनी रिट याचिकेचा अभ्यास करुन, शासनाचे प्रचलित धोरणात्मक निर्णय, अधिसूचना, नियम, अधिनियम, परिपत्रके इत्यादी बाबी विचारात घेऊन तात्काळ परिच्छेद निहाय अभिप्राय तयार करुन जिल्हा परिषदेच्या पॅनलवरील अभियोक्ता यांच्याकडुन शपथपत्राचा मसुदा तयार करुन सदर मसुद्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन विहित कालावधीत शपथपत्र मा. न्यायालयात दाखल होईल याची दक्षता घ्यावी.

४) न्यायालयीन प्रकरणी प्रत्येक सुनावणीच्या वेळी संबंधित अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या पॅनलवरील प्राधिकृत अभियोक्ता न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहिल याबाबतची दक्षता तसेच सदर सुनावणीच्या वेळी मा. न्यायालयाने दिलेल्या निदेशाची माहिती त्याच दिवशी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

५) जिल्हा परिषदेतील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या संबंधी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन यांच्याकडे प्रलंबित राहत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्येक अधिकाऱ्याकडे प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाचा दर आठवडयाला आढावा घेण्यात यावा. जर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य प्रशासन) यांचेकडे एक महीन्याच्या वर न्यायालयीन प्रकरण प्रलंबित राहील्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करुन त्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

६) ग्रामविकास विभागाने प्रायोगिक तत्वावर घेतलेल्या Manage My LawSuits मध्ये जिल्हा परिषदेमधील सर्व न्यायालयीन प्रकरणाची माहिती अद्यावत करण्याची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य प्रशासन) यांची राहिल.

७) संबधीत न्यायालयीन प्रकरणात शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या विरोधात निकाल लागला असेल तर, त्याबाबत शासनास आवश्यक त्या कागदपत्रांसह अवगत करावे व अशा न्यायनिर्णयाविरुध्द अपील, पुर्नविलोकन याचिका किंवा विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचे जिल्हा परिषदेच्या विधि अधिकाऱ्याचे मत असल्यास, अशा प्रकरणी त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

८) प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग हे सर्व जिल्हा परिषदांमधील न्यायालयीन प्रकरणाचा व्हिडीओ कॉन्फरन्सने आढावा घेतील.

९) या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन होईल याबाबतचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहिल. एखाद्या न्यायालयीन प्रकरणी विलंब/दिरंगाई झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्त भंगाची योग्य कार्यवाही करावी व तशा कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२८१३१८४७६४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.06.29 17:20:36 +05'30'

(असीम गुप्ता)
प्रधान सचिव ग्रामविकास विभाग

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक
२. सचिव, (प्र.मं.ग्रा.स.यो), ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व सह/उपसचिव, ग्रामविकास विभाग.
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
६. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
७. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग.
८. निवडनस्ती विधि कक्ष